# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई, यांच्या आस्थापनेवरील सहाय्यक संचालक (तांत्रिक), संगणक प्रणाली प्रशासक, डाटाबेस / वेब प्रशासक, स्वीय सहाय्यक (उच्च श्रेणी), उच्च श्रेणी लघुटंकलेखक (मराठी), उच्च श्रेणी लघुटंकलेखक (इंग्रजी), लिपिक-टंकलेखक-नि-कार्यालय सहाय्यक, ग्रँथपाल नि कार्यालय सहाय्यक, वाहन चालक-नि-सामान्य सहाय्यक आणि शिपाई ही पदे सरळ सेवा प्रवेशाच्या तत्वावर भरण्यासाठी सविस्तर जाहिरात:-**

## १. प्रस्तावना

विद्युत नियामक आयोग अधिनियम, १९९८, या केंद्रीय कायद्याखाली महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (आयोग) ची स्थापना ५ ऑगस्ट, १९९९ रोजी झाली. या अधिनियमाला विद्युत अधिनियम, २००३ (वि.अ. २००३) ने अधिक्रमित केले आहे. आयोगा तर्फे विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६ अंतर्गत विविध कार्ये जशी, वीजनिर्मितीसाठी, पारेषणासाठी आणि विजेच्या वहनासाठी वीज दर निश्चित करणे; महाराष्ट्र राज्यात विजेच्या घाऊक किंवा किरकोळ पुरवठ्यासाठी, जसे असेल तसे, वीज दर निश्चित करणे; वितरण परवानाधारकांची विजेची खरेदी आणि ती प्राप्त करुन घेण्याच्या प्रक्रियेचे नियमन करणे; विजेचे पारेषण, वितरण आणि व्यापार यासाठी परवाना मंजूर करणे आणि नूतनशील ऊर्जा स्त्रोतांद्वारे वीजनिर्मिती/सहनिर्मितीस चालना देणे, पार पाडण्यात येतात.

## २. आयोगाच्या कार्यांची पार्श्वभूमी

विद्युत अधिनियम, २००३ अंतर्गत वीज निर्मितीसाठी परवान्याची गरज आता राहिलेली नाही. तथापि, पारेषण आणि वितरण कंपन्यांना मात्र त्यांच्या कार्यासाठी आयोगाकडून परवाना घ्यावा लागतो. भारत सरकारने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार बोली प्रक्रियेच्या माध्यमातून निश्चित करण्यात आलेले वीज दर स्वीकारणे, राज्यातील वीज ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्यासाठी विजेची निर्मिती, पारेषण आणि वितरण करण्याच्या कार्यांत गुंतेलेल्या विद्युत कंपन्यांकरिता बहुवर्षीय वीज दर निश्चित करणे, एकूण महसुली गरजेचा आढावा घेणे व मंजूर करणे, वार्षिक कामगिरीचा आढावा घेणे आणि त्यांच्या एकूण महसुली गरजेचे अचूक समायोजन करणे या बाबींचा इतर अन्य बाबींबरोबरच आयोगाच्या कार्यांमध्ये सहभाग होतो. या विद्युत कंपन्यांमध्ये महानिर्मिती कंपनी/महापारेषण कंपनी/महावितरण कंपनी/बेस्ट/दि टाटा पॉवर कंपनी लि.(टीपीसी)/रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. (आरइन्फ्रा), जेएसडब्ल्यु

एनर्जी रत्नागिरी लि. (जेएसडब्ल्यु इआरएल), वर्धा पॉवर कंपनी लि. (डब्ल्युपीसीएल), अमरावती पॉवर कंपनी लि. (एपीसीएल), जीएमआर पॉवर लि. आणि नूतनशील आणि पारंपारिक ऊर्जा क्षेत्रातील अनेक कंपन्यांचा समावेश होतो. आयोगातर्फे विद्युत कंपन्या आणि ग्राहक यांच्यातील वादांचे निराकरण ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच आणि विद्युत लोकपालामार्फत करण्यात येते. आयोगाकडून विजेच्या संबंधित विविध प्रश्नांबाबत राज्यशासनाला वेळोवेळी सल्ला देण्यात येतो. आयोगाकडे विद्युत कंपन्या/ग्राहक आणि अन्य विविध हितसंबंधितांनी दाखल केलेल्या याचिकांवर आयोगाकडून विद्युत अधिनियम, २००३ अंतर्गत विहित करण्यात आलेल्या उचित नियामक प्रक्रियेचे आणि आयोगाने केलेल्या संबंधित विनियमांचे पालन करुन आदेश पारित करण्यात येतात.

आयोगाने आपल्या आस्थापनेवरील **सहाय्यक संचालक (तांत्रिक), संगणक प्रणाली प्रशासक, डाटाबेस / वेब प्रशासक, स्वीय सहाय्यक** (**उच्च श्रेणी**), **उच्च श्रेणी लघुटंकलेखक** (**मराठी**), **उच्च श्रेणी लघुटंकलेखक** (**इंग्रजी**), **लिपिक-टंकलेखक-नि-कार्यालय सहाय्यक ग्रँथपाल नि कार्यालय सहाय्यक, वाहन चालक-नि-सामान्य सहाय्यक आणि शिपाई** ही नव्याने निर्माण करण्यात आलेली पदे सरळ सेवा प्रवेशाच्या तत्वावर भरण्याचे ठरविले आहे. या पदांच्या संबंधी पात्रता निकष आणि इतर अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत:-

**पात्रता निकष आणि इतर अटी व शर्ती**

१) **पदाचे नाव:-** **सहाय्यक संचालक (तांत्रिक)**

**मंजूर पद:-** **४ (चार) - २ अराखीव, १ अजा, १ अज**

**वेतनश्रेणी:-** रू.९,३००-३४,८००, ग्रेड पे - रू.४,४००. याशिवाय महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार महागाई भत्ता, घरभाडे भत्ता आणि इतर भत्ते लागू राहतील (एकूण मासिक स्थूल वेतन अंदाजे रू. २९,८६४/-).

**शैक्षणिक अर्हता:-**

(अ) मान्यताप्राप्त विद्यापीठातून विद्युत / पॉवर अभियांत्रिकीमधील पदवी.

किंवा

(ब) मान्यताप्राप्त विद्यापीठातील पदवीसह एआयसीटीईची मान्यता असलेल्या विद्यापीठ / संस्थेमधील एमबीए किंवा अर्थशास्त्र /गणितशास्त्र/ सांख्यिकी / पर्यावरण शास्त्र यामधील पदव्युत्तर पदवी किंवा कॉस्ट अकाउन्टंट.

**अनुभवः-**

(अ) विद्युत क्षेत्र / विद्युत कंपनी / परवानाधारक / नियामक आयोगामध्ये कामाचा किमान ३ वर्षांचा अनुभव;
(ब) मराठी आणि इंग्रजी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य;
(क) संगणक विषयक ज्ञान आवश्यक.

**वयोमर्यादा (१०.१२.२०११ रोजी):-** उमेदवाराचे कमाल वय ३५ वर्षाहून अधिक नसावे.

२) **पदाचे नावः- संगणक प्रणाली प्रशासक**

**मंजूर पदः- १ (एक) - अराखीव**

**वेतनश्रेणीः-** रू.९,३००-३४,८००, ग्रेड पे - रू.४,४००. याशिवाय महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार महागाई भत्ता, घरभाडे भत्ता आणि इतर भत्ते लागू राहतील (एकूण मासिक स्थूल वेतन अंदाजे रू.२९,८६४/-).

**शैक्षणिक अर्हताः-**

(अ) मान्यताप्राप्त विद्यापीठ / संस्थेतून संगणक विज्ञान / माहिती तंत्रज्ञान पदविका आणि रेड हॅट सर्टीफाईड इंजिनिअर (आरएचसीइ).

किंवा

(ब) संगणक विज्ञान / माहिती तंत्रज्ञान विषयात पदवी किंवा संगणक विज्ञान/ माहिती तंत्रज्ञान विषयात पदव्युत्तर पदवी आणि रेड हॅट सर्टीफाईड इंजिनिअर (आरएचसीइ).

**अनुभवः-**

(अ) केंद्र/राज्य शासकीय विभाग उपक्रम किंवा विद्युत कंपन्या किंवा विद्युत नियामक आयोग किंवा प्रख्यात सॉफ्टवेअर / हार्डवेअर कंपन्यांमधील संगणक प्रणाली प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) कामाचा ४ वर्षांचा अनुभव आवश्यक;
(ब) मराठी आणि इंग्रजी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य.

**वयोमर्यादा (१०.१२.२०११ रोजी):-** उमेदवाराचे कमाल वय ३५ वर्षाहून अधिक नसावे.

३) **पदाचे नाव:- डाटाबेस / वेब प्रशासक**

**मंजूर पद:- १ (एक) - अराखीव**

**वेतनश्रेणी:-** रू.९,३००-३४,८००, ग्रेड पे - रू.४,४००. याशिवाय महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार महागाई भत्ता, घरभाडे भत्ता आणि इतर भत्ते लागू राहतील (एकूण मासिक स्थूल वेतन अंदाजे रू.२९,८६४/-)

**शैक्षणिक अर्हता:-**

(अ) मान्यताप्राप्त विद्यापीठ / संस्थेतून संगणक विज्ञान / माहिती तंत्रज्ञान पदविका आणि ओरॅकल प्रमाणित.

किंवा

(ब) संगणक विज्ञान / माहिती तंत्रज्ञान विषयात पदवी किंवा संगणक विज्ञान/ माहिती तंत्रज्ञान पदव्युत्तर पदवी आणि ओरॅकल प्रमाणित.

**अनुभव:-**

(अ) केंद्र/राज्य शासकीय विभाग, उपक्रम किंवा विद्युत कंपन्या किंवा विद्युत नियामक आयोग किंवा प्रख्यात सॉफ्टवेअर / हार्डवेअर कंपन्यांमधील डाटाबेस प्रशासनाचा आणि वेब डिझायनिंग / प्रोग्रामिंग / ओरॅकल डाटाबेस कामाचा ४ वर्षांचा अनुभव आवश्यक;

(ब) मराठी आणि इंग्रजी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य.

**वयोमर्यादा (१०.१२.२०११ रोजी):-** उमेदवाराचे कमाल वय ३५ वर्षाहून अधिक नसावे.

४) **पदाचे नाव:- स्वीय सहाय्यक (उच्च श्रेणी)**

**मंजूर पद:- १ (एक) - अजा**

**वेतनश्रेणी:-** रू.९,३००-३४,८००, ग्रेड पे - रू.४,४००. याशिवाय महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार महागाई भत्ता, घरभाडे भत्ता आणि इतर भत्ते लागू राहतील (एकूण मासिक स्थूल वेतन अंदाजे रू.२९,८६४/-)

**शैक्षणिक अर्हता:-**

(अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्नातक पदवी.

(ब) लघुलेखनाची प्रति मिनिट १२० शब्द आणि टंकलेखनाची प्रति मिनिट ४० इंग्रजी शब्दांची गती असल्याचे शासकीय वाणिज्यिक प्रमाणपत्र असणे आवश्यक.

**अनुभव:-**

(अ) ५ वर्षाचा कामाचा अनुभव, शासकीय विभाग किंवा सार्वजनिक उपक्रम किंवा सार्वजनिक कंपनीमधील स्वीय सहाय्यक म्हणून काम केलेले असल्यास अधिक पसंती;

(ब) मराठी आणि इंग्रजी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य;

(क) मायक्रोसॉफ्ट ऑफिसमध्ये (एमएस-वर्ड, एमएस-एक्सेल, एमएस-पॉवर पॉईन्ट सादरीकरण, एमएस-आऊटलुक, इ.) प्राविण्य.

**वयोमर्यादा (१०.१२.२०११ रोजी):-** उमेदवाराचे कमाल वय ३५ वर्षाहून अधिक नसावे.

**५) पदाचे नाव:- उच्च श्रेणी लघुटंकलेखक (मराठी)**

**मंजूर पद:- १ (एक) - अराखीव**

**वेतनश्रेणी:-** रू.९,३००-३४,८००, ग्रेड पे - रू.४,४००. याशिवाय महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार महागाई भत्ता, घरभाडे भत्ता आणि इतर भत्ते लागू राहतील. (एकूण मासिक स्थूल वेतन अंदाजे रू.२९,८६४/-)

**शैक्षणिक अर्हता:-**

(अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्नातक पदवी.

(ब) लघुलेखनाची प्रति मिनिट १२० शब्द आणि टंकलेखनाची प्रति मिनिट ४० मराठी शब्दांची गती असल्याचे शासकीय वाणिज्यिक प्रमाणपत्र आवश्यक.

(क) इंग्रजीतून मराठीत भाषांतर कौशल्य असणे आवश्यक.

**अनुभव:-**

(अ) ५ वर्षाचा कामाचा अनुभव, शासकीय विभाग किंवा सार्वजनिक कंपनी किंवा सार्वजनिक उपक्रमात उच्च श्रेणी लघुलेखक (मराठी) म्हणून काम केलेले असल्यास अधिक पसंती;

(ब) मराठी आणि इंग्रजी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य;

(क) संगणक विषयक ज्ञान आवश्यक.

**वयोमर्यादा (१०.१२.२०११ रोजी):-** उमेदवाराचे कमाल वय ३५ वर्षाहून अधिक नसावे.

६) **पदाचे नाव:-  उच्च श्रेणी लघुटंकलेखक (इंग्रजी)**

**मंजूर पद:-   १ (एक) - अराखीव**

**वेतनश्रेणी:-** रू.९,३००-३४,८००, ग्रेड पे - रू.४,४००. याशिवाय महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार महागाई भत्ता, घरभाडे भत्ता आणि इतर भत्ते लागू राहतील (एकूण मासिक स्थूल वेतन अंदाजे रू.२९,८६४/-).

**शैक्षणिक अर्हता:-**

(अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्नातक पदवी.
(ब) लघुलेखनाची प्रति मिनिट १२० शब्द आणि टंकलेखनाची प्रति मिनिट ६० इंग्रजी शब्दांची गती असल्याचे शासकीय वाणिज्यिक प्रमाणपत्र आवश्यक.

**अनुभव:-**

(अ) ५ वर्षाचा कामाचा अनुभव, शासकीय विभाग किंवा सार्वजनिक उपक्रम किंवा सार्वजनिक कंपनीत उच्च श्रेणी लघुलेखक (इंग्रजी) म्हणून काम केलेले असल्यास अधिक पसंती;
(ब) मराठी आणि इंग्रजी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य;
(क) संगणक विषयक ज्ञान आवश्यक.

**वयोमर्यादा (१०.१२.२०११ रोजी):-** उमेदवाराचे कमाल वय ३५ वर्षाहून अधिक नसावे.

७) **पदाचे नाव:-   लिपिक-टंकलेखक नि कार्यालय सहाय्यक**

**मंजूर पद:-   ३ (तीन) - २ अराखीव (१ महिला), १ विजा (अ) / भज (ब)/ भज (क) / भज (ड)**

टिप - लिपिक-टंकलेखक नि कार्यालय सहाय्यकाच्या २ अराखीव पदापैकी १ पद महिलांसाठी राखीव राहील.

- लिपिक-टंकलेखक नि कार्यालय सहाय्यकाचे १ पद विजा (अ) साठी राखीव राहील. तथापि, विजा (अ) या प्रवर्गातील सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास, भज (ब) किंवा भज (क) किंवा भज (ड) या प्रवर्गातील उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

**वेतनश्रेणी:-** रू.५,२००-२०,२००, ग्रेड पे - रू.१,९००. याशिवाय महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार महागाई भत्ता, घरभाडे भत्ता आणि इतर भत्ते लागू राहतील (एकूण मासिक स्थूल वेतन अंदाजे रू.१४,९३२/-).

**शैक्षणिक अर्हता:-**

(अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्नातक पदवी.

(ब) संगणक ॲप्लिकेशन्स मधील पदविका / प्रमाणपत्र.

**अनुभव:-**

(अ) संगणक वापरासह एमएस ऑफिस सूट/ विंडोज ऑपरेटींग सिस्टीम, इंटरनेट आणि ई-मेल ॲप्लिकेशन्स यांच्या अगदी अलिकडच्या आवृत्ती वापरण्याच्या प्रत्यक्ष कामाचा १ वर्षाचा अनुभव;

(ब) मराठी आणि इंग्रजी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य.

**वयोमर्यादा (१०.१२.२०११ रोजी):-** उमेदवाराचे कमाल वय ३५ वर्षाहून अधिक नसावे.

**८) पदाचे नाव:- ग्रंथपाल नि कार्यालयीन सहाय्यक**

**मंजूर पद:- १ (एक) - अराखीव**

**वेतनश्रेणी:-** रू.५,२००-२०,२००, ग्रेड पे - रू.१,९००. याशिवाय महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार महागाई भत्ता, घरभाडे भत्ता आणि इतर भत्ते लागू राहतील (एकूण मासिक स्थूल वेतन अंदाजे रू.१४,९३२/-).

**शैक्षणिक अर्हता:-**

(अ) मान्यताप्राप्त विद्यापीठ / संस्थेची कोणत्याही शाखेतील पदवी.

(ब) ग्रंथालय विज्ञान पदवी असणाऱ्यास प्राधान्य

**अनुभव:-**

(अ) प्रख्यात संस्थेत ग्रंथालय देखभालीच्या कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

(ब) मराठी आणि इंग्रजी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य;

(क) संगणक विषयक ज्ञान आवश्यक.

**वयोमर्यादा (१०.१२.२०११ रोजी):-** उमेदवाराचे कमाल वय ३५ वर्षाहून अधिक नसावे.

९) **पदाचे नावः- वाहन चालक-नि-सामान्य सहाय्यक**

**मंजूर पदः- १ (एक) - अज**

**वेतनश्रेणीः-** रू.५,२००-२०,२००, ग्रेड पे - रू.१,९००. याशिवाय महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार महागाई भत्ता, घरभाडे भत्ता आणि इतर भत्ते लागू राहतील (एकूण मासिक स्थूल वेतन अंदाजे रू.१४,९३२/-).

**शैक्षणिक अर्हताः-**

(अ) शासनमान्य शाळेतून ८ वी इयत्ता उत्तीर्ण.
(ब) ५ वर्षाचा हलकी मोटर वाहने चालविण्याचा परवाना.

**अनुभवः-**

(अ) किमान ५ वर्षे मोटर वाहने चालविण्याचा अनुभव.
(ब) वाहने चालविण्याचा स्वच्छ रेकॉर्ड आणि मोटर वाहने किंवा जीप दुरुस्तीचे कामचलाऊ ज्ञान.
(क) स्थानिक क्षेत्राची आणि मार्गांची माहिती असली पाहिजे.

**वयोमर्यादा (१०.१२.२०११ रोजी):-** उमेदवाराचे कमाल वय ३५ वर्षाहून अधिक नसावे.

१०) **पदाचे नावः- शिपाई**

**मंजूर पदः- ४ (चार) - २ अराखीव (१ महिला), १ विजा (अ) / भज (ब)/ भज (क) / भज (ड), १ इमाव**

टिप - शिपाई पदाच्या २ अराखीव पदापैकी १ पद महिलांसाठी राखीव राहील.

- शिपाईचे १ पद विजा (अ) साठी राखीव राहील. तथापि, विजा (अ) या प्रवर्गातील सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास, भज (ब) किंवा भज (क) किंवा भज (ड) या प्रवर्गातील उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

**वेतनश्रेणीः-** रू.४,४४०-७,४४०, ग्रेड पे - रू.१,३००. याशिवाय महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार महागाई भत्ता, घरभाडे भत्ता आणि इतर भत्ते लागू राहतील. (एकूण मासिक स्थूल वेतन अंदाजे रू.११,६९९/-)

**शैक्षणिक अर्हताः-**

शासनमान्य शाळेतून ८ वी इयत्ता उत्तीर्ण असणे आवश्यक.

**अनुभव:-**

(अ) चांगली शरीरयष्टी आवश्यक.

(ब) कार्यालयीन कामकाजाचा अनुभव.

(क) मराठी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य.

(ड) संगणक विषयक ज्ञान असल्यास अधिक पसंती.

**वयोमर्यादा (१०.१२.२०११ रोजी):-** उमेदवाराचे कमाल वय ३५ वर्षाहून अधिक नसावे.

**इतर अटी** :-

**(१) सेवाशर्ती :-**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कर्मचाऱ्यांच्या सेवा भरती आणि सेवा शर्ती), २००७ आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कर्मचाऱ्यांच्या सेवा भरती आणि सेवा शर्ती) (सुधारणा), २०११ मधील सेवेच्या अटी व शर्ती आयोगाच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांना लागू राहतील. हे विनियम आयोगाच्या www.mercindia.org.in संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**(२) निवास व्यवस्था :-**

आयोगाकडून निवास व्यवस्था करण्यात येणार नाही. निवड झालेल्या उमेदवारास निवासाची सोय स्वत: करावी लागेल.

**(३) अर्ज विहित केलेल्या नमुन्यात साध्या कागदावर सादर करणेबाबत :-**

३.१ अर्ज विहित केलेल्या नमुन्यात साध्या कागदावर सादर करण्यात यावा.

३.२ अर्ज विहित नमुन्याप्रमाणे चांगल्या प्रतीच्या सफेद ए-४ आकाराच्या कागदावर स्वच्छ आणि स्पष्ट हस्ताक्षरात लिहावा आणि त्यावर अलीकडचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (फोटो) स्वाक्षरी करुन चिकटविण्यात यावे.

३.३ अर्जदाराने सर्व रकान्यातील माहिती अचूकपणे भरल्याची तसेच छायाचित्रावर सही केल्याची खात्री करावी.

३.४ पाकिटावर ज्या पदासाठी अर्ज करण्यात आला असेल त्या पदाचे नाव लिहावे.

३.५ **<u>एखादा उमेदवार जर एकापेक्षा अधिक पदांसाठी पात्र असेल आणि तो जर अशा अधिक पदांसाठी अर्ज करण्यास इच्छुक असेल तर त्याला अशा प्रत्येक पदासाठी वेगळा अर्ज करावा लागेल आणि आवश्यक शुल्क (लागू असल्यास) भरावे लागेल. एकापेक्षा अधिक पदांसाठी एकच अर्ज सादर केल्यास तो अवैध ठरविण्यात येईल आणि नाकारण्यात येईल.</u>**

३.६ सादर करण्यात आलेल्या अर्जासोबत आवश्यक फी नसेल किंवा अपूर्ण भरलेला असेल किंवा वाचता येण्याजोगा नसेल किंवा विहित नमुन्यात नसेले किंवा फोटोशिवाय असेल किंवा त्यावर स्वाक्षरी केलेली नसेल तर असा अर्ज नाकारण्यात येईल आणि आयोगाकडून त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

**(४) अर्ज नियंत्रण अधिकाऱ्यामार्फत सादर करणे :-**

४.१ शासकीय विभागात/सार्वजनिक उपक्रमात/विद्युत कंपन्यांमध्ये कार्यरत असलेल्या व्यक्तिंनी त्यांचे अर्ज नियंत्रण अधिकाऱ्यामार्फत पाठवावेत.

४.२ अर्ज जर नियंत्रण अधिकारी/मालका मार्फत पाठवावयाचा असेल आणि या प्रक्रियेत अर्ज जर आयोगाच्या कार्यालयात शेवटच्या तारखेनंतर प्राप्त झाला तर, असा अर्ज नियंत्रण अधिकारी/मालककाकडे शेवटच्या तारखेपूर्वी जरी सादर करण्यात आला असला तरी तो विचारात घेतला जाणार नाही. अशा प्रकरणी, असा अर्ज 'आगाऊ प्रत' असे अर्जावर नमूद करुन आयोगाकडे वरील पत्त्यावर अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या तारखेपूर्वी मिळेल अशा बेताने थेट पाठविण्यात यावा आणि त्याची नियमित प्रत सध्याच्या नियंत्रण अधिकारी/मालकामार्फत पाठविण्यात यावी.

**(५) अर्जासोबत पाठवावयाचे शुल्क (विना परताव्याचे) :-**

अराखीव वर्गवारीसाठी - रु. २००/- फक्त (रुपये दोनशे फक्त),

राखीव वर्गवारीसाठी - रु. १००/- फक्त (रुपये शंभर फक्त) शुल्क मुंबई येथे देय असलेल्या **'महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग'** या नावे काढलेल्या धनाकर्ष (डीमांड ड्राफ्ट) पाठविण्यात यावे. सदर धनाकर्षाच्या मागील बाजूवर उमेदवाराने त्याचे नाव आणि पत्ता लिहावा व तो अर्जासोबत जोडावा. एकदा भरलेले शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत करण्यात येणार नाही.

**(६) शैक्षणिक अर्हता आणि अनुभवाचे प्रमाणपत्र :-**

**अ. सहाय्यक संचालक (तांत्रिक), संगणक प्रणाली प्रशासक, डाटाबेस / वेब प्रशासक, स्वीय सहाय्यक (उच्च श्रेणी), उच्च श्रेणी लघुटंकलेखक (मराठी), उच्च श्रेणी लघुटंकलेखक (इंग्रजी), लिपिक-टंकलेखक-नि-कार्यालय सहाय्यक, ग्रँथपाल नि कार्यालय सहाय्यक या पदासाठी -** जन्मतारखेसाठी उच्च माध्यमिक / माध्यमिक शालांत परीक्षेचे प्रमाणपत्र (एस.एस.सी/ एच.एस.सी.) तसेच आवश्यक शैक्षणिक अर्हता आणि अनुभव प्रमाणपत्राच्या राजपत्रित अधिकारी / सक्षम प्राधिकाऱ्यांनी साक्षांकित केलेल्या छायाप्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

**ब. वाहन चालक-नि-सामान्य सहाय्यक या पदासाठी -** ५ वर्षाचा हलकी मोटर वाहने चालविण्याचा परवाना. आवश्यक शैक्षणिक अर्हता आणि अनुभव प्रमाणपत्राच्या राजपत्रित अधिकारी / सक्षम प्राधिकाऱ्यांनी साक्षांकित केलेल्या छायाप्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

**क. शिपाई या पदासाठी -** आवश्यक शैक्षणिक अर्हता आणि अनुभव प्रमाणपत्राच्या राजपत्रित अधिकारी / सक्षम प्राधिकाऱ्यांनी साक्षांकित केलेल्या छायाप्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

**(७) जातीचे प्रमाणपत्र :-**

अ.जा./अ.ज./वि.जा.(अ)/भटक्या जमाती (ब) / भटक्या जमाती (ड) / इ.मा.व. या प्रवर्गातील उमेदवारांनी अर्जासोबत जातीचे प्रमाणपत्र जोडावे.

अ.जा./अ.ज./ वि.जा.(अ)/भटक्या जमाती (ब) / भटक्या जमाती (ड) / इ.मा.व. या प्रवर्गातील उमेदवाराची निवड झाल्यानंतर त्यांना विहित कालावधीत सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**(८) उन्नत व्यक्ति/गट (क्रिमी लेअर) :-**

वि.जा.(अ)/भटक्या जमाती (ब) / भटक्या जमाती (ड) / इ.मा.व. उमेदवारांनी समाजाच्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे दि.३१ मार्च, २०११ पर्यंतचे वैध असलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा त्याचा आरक्षित पदासाठी विचार केला जाणार नाही.

**(९) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन :-**

शासन अधिसूचना एसआरव्ही २०००/प्रक्र(१७/२०००) / बारा, दि.२८ मे, २००५ नुसार अर्जदाराने अर्जासोबतच्या विहित *नमुना अ* मध्ये प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे *(परिशिष्ट - अ).*

**(१०) महिला आरक्षण :-**

१०.१ महिलांसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५ मे, २००१ आणि तद्नंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

१०.२ महिलांच्या आरक्षित पदांच्या लाभाकरिता उमेदवार महाराष्ट्र राज्याचा सर्वसाधारणपणे रहिवासी असावा.

१०.३ महिलांचे आरक्षण हे त्या त्या प्रवर्गासाठी समांतर आरक्षण राहील. तथापि भरतीच्या वर्षात मागासवर्गीय महिलांकरिता आरक्षित पदांसाठी त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत, तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या-त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमार्फत भरण्यात येईल.

१०.४ खुल्या संवर्गातील महिलांसाठी आरक्षित असलेल्या जागेवर नियुक्तीकरिता त्या संवर्गातील योग्य महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या जागा अराखीव समजण्यात येतील.

१०.५ खुल्या संवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/कुटुंबातील (क्रिमी लेअर) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती / कुटुंबातील महिला सदस्यांना महिलांचे ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

१०.६ खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी त्या क्रिमीलेअर प्रवर्गातील महिला नसल्याचे अर्जात नमूद करणे आवश्यक आहे.

१०.७ खुल्या प्रवर्गातील महिला उन्नत अथवा प्रगत व्यक्ती/गट (क्रिमी लेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचा प्रमाणपत्राचा नमुना सोबतच्या *परिशिष्ट - ब* मध्ये दिलेला आहे.

१०.८ मागासवर्गीयांच्या प्रवर्गातील महिला उमेदवार खुल्या प्रवर्गातील जागांकरिता विकल्प देतील किंवा विकल्प न देताही मागासवर्गीयांच्या प्रवर्गातील महिला उमेदवारांची निवड खुल्या

प्रवर्गातील महिलांच्या आरक्षित पदावर झाल्यास, अशा महिला उमेदवारांना प्रमाणपत्र सादर करण्याबाबत खालील दोन विकल्प राहतील :-

- सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभाग अथवा विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग यांनी विहित केल्याप्रमाणे त्यांच्या संबंधित जातीची प्रमाणपत्रे (क्रिमी लेअर प्रमाणपत्रासह) सादर करावीत. अशा महिला उमेदवारांनी खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता विहित केलेले क्रिमी लेअरचे प्रमाणपत्र देण्याची आवश्यकता नाही.
- संबंधित जातीचे विहित प्रमाणपत्र सादर करू इच्छित नसणा-या किंवा सादर करू न शकलेल्या महिला उमेदवारांनी खुल्या प्रवर्गातील महिलांप्रमाणेच *परिशिष्ट - ब* नुसार विहित केलेले उन्नत व्यक्ती / गट (क्रिमी लेअर) मध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

१०.९ शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक सी.बी.सी.-१०९८ / प्र.क्र.१५१ / मावक-५, दिनांक ७ मे, १९९९ अन्वये शासनाने आंतरजातीय विवाह केलेल्यांना मिळणा-या मागासवर्गाच्या सवलती/फायदे रद्द केले आहेत. त्यानुसार आंतरजातीय विवाह केलेल्या उमेदवारांनी अर्ज सादर करताना आवश्यक ती दक्षता घ्यावी.

१०.१० शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही - १०९७ / प्र.क्र. ३१ / ९८ / १६ - अ, दिनांक १६ मार्च, १९९९ नुसार महिला आरक्षणाबाबत कार्यवाही करण्यात येईल.

## (११) शारीरिक पात्रता :-

नामनिर्देशनाने निवड झालेल्या उमेदवारांची नेमणूक ही त्यांनी शारीरिक पात्रतेसंबंधी वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावयाच्या अधीन राहील.

## (१२) चारित्र्य / पूर्वेतिहासाची तपासणी :-

नामनिर्देशनाने निवड झालेल्या उमेदवारांची नेमणूक चारित्र्य आणि पूर्वेतिहास संबंधी पोलिसांकडून होणाऱ्या तपासणीच्या अधीन राहील.

**(१३) लेखी परीक्षा आणि मुलाखत :-**

आयोग सर्व पदांसाठी लेखी परीक्षा आणि मुलाखत घेऊ शकेल. तांत्रिक व भाषेतील कौशल्याची चाचणी घेण्यासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या लेखी परीक्षा आणि मुलाखतीसाठी उमेदवाराने उपस्थित राहणे आवश्यक राहील. परिक्षा इंग्रजी अथवा मराठी भाषेतून घेण्यात येईल.

**(१४)** अर्जांची संख्या जास्त असल्यास निकष ठरवून त्या आधारे अर्जांची छाननी करून उमेदवारांची संख्या मर्यादित केली जाईल व त्यानंतर आवश्यकतेनुसार लेखी परिक्षा घेऊन त्या आधारे मर्यादित उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविले जाईल.

**(१५)** महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आस्थापनेवरील जाहिरातीमधील भरावयाच्या पदसंख्येत व आरक्षण / समांतर आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे. तसेच या व अन्य कारणामुळे निवड प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द केली जाईल.

**(१६)** सदर पदे आयोगाच्या धोरणानुसार भरण्यात येत असल्याने सदरहू जाहिरातीतील पदे भरण्यास प्रशासकीय किंवा तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास कार्यवाही स्थगित / रद्द करण्याचे अधिकार आयोगास राहतील.

**(१७) शिफारस :-**

उमेदवाराच्या निवडीसाठी/भरतीसाठी उमेदवाराच्या वतीने शिफारस करण्यात आल्यास किंवा कोणतेही राजकीय अथवा अन्य बाह्य दडपण आणण्यात आल्यास अशा उमेदवारास भरतीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

**(१८) अर्ज नाकारण्याचा हक्क :-**

आयोग कोणताही अर्ज किंवा सर्व अर्ज कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क राखून ठेवीत आहे.

**(१९) प्रवास भत्ता :-**

लेखी परीक्षा/मुलाखतीसाठी बोलविण्यात आलेल्या उमेदवारांना कोणताही प्रवास भत्ता देय नसेल.

**(२०) अर्जाच्या छापील नमून्याच्या प्रतीसाठी शुल्क आकारणी :-**

अनुक्रमांक ९ व १० येथील पदांकरीता, जे उमेदवार व्यक्तीशः विनंती करतील त्यांना प्रति अर्जाकरीता रू.२०/- चा भरणा केल्यास आयोग त्यांना छापील अर्ज उपलब्ध करून देईल.

**(२१) अर्ज पोस्टाने/कुरीयरने पाठविणे :-**

अर्ज संपूर्ण तपशीलासह सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र, केंद्र क्रमांक १, १३ वा मजला, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५, यांचेकडे पोस्टाने किंवा कुरीयरमार्फत पाठविण्यात यावा. **ई-मेल द्वारे किंवा फॅक्स द्वारे पाठविण्यात आलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.**

**(२२) अर्ज प्राप्त होण्यास झालेला विलंब :-**

अर्जदाराकडून पाठविण्यात आलेला अर्ज मार्गस्थ असताना गहाळ झाल्यास किंवा आयोगास प्राप्त होण्यास विलंब झाल्यास त्यास आयोग जबाबदार राहणार नाही.

**(२३) अर्ज प्राप्त होण्याची अंतिम तारीख :-**

खाली सही करणाऱ्याकडे विहित नमुन्यात केलेला अर्ज **०९/०१/२०१२** रोजी संध्याकाळी ५.३० पर्यंत किंवा त्यापूर्वी मिळेल अशा बेताने पाठविण्यात यावा. **०९/०१/२०१२** रोजी संध्याकाळी ५.३० नंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

सही/-
(कुलदीप ना. खवारे)
सचिव, मविनिआ

मुंबई,

दिनांक: १०/१२/२०११